इचलकरंजी महानगरपालिका
महिला व बालकल्याण विभाग
जाहिर प्रकटन

इचलकरंजी महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागाअंतर्गत महिलांना रोजगार / स्वयंरोजगार उपलब्ध् करुन देऊन आर्थिक दृष्टया स्वावलंबी करणेच्या उददेशाने शहरातील मुलींना व महिलांना **ड्रायव्हींग (थ्री-व्हीलर)** प्रशिक्षण देणे. सदर थ्री-व्हीलर ड्रायव्हींगचे कच्चे व पक्के दोन्ही लायसन देणे बंधनकारक राहील याकामी दरपत्रक / कोटेशन मागविणेत येत आहे. सदर दरपत्रक / कोटेशन दि. 28 /02/2025 ते दि. 04 /03/2025 अखेर पर्यंत कार्यालयीन वेळेत महानगरपालिकेच्या बारनिशी विभागात स्विकारणेत येईल. सोबत लागणारी आवश्यक कागदपत्रे पुढीलप्रमाणे **अ)लिफाफा क्र.1 मध्ये सदरची कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.** 1) व्यक्ती / संस्था नोंदणी प्रमाणपत्र 2) समतूल्या कामाचा अनुभव असलेली कागदपत्रे 3) मक्तेदाराचे पॅन कार्ड याची सत्य प्रत. 4) वित्तीय समर्थता- बँक सॉलव्हन्सी / आय.टी.रिटर्न तीन वर्ष (कामाच्या अंदाजपत्रकानुसार) 5) जी.एस.टी. रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र 6) भारतात / राज्यात कोणत्याही शासकीय/निमशासकीय विभागाकडून काळा यादीत टाकले नसलेबाबतचे स्वयंघोषणा पत्र. 7) पदाधिकारी सहभाग नसलेबाबतचे प्रतिज्ञापत्र.

प्राप्त दरपत्रक / कोटेशन दि. 05 /03 /2025 रोजी दु. 4.00 वाजता उघडणेत येईल. याबाबतची सर्व अटी व शर्ती महिला व बालकल्याण विभागाकडे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

दि.28 /02/2025

(स्मृती पाटील)
उपायुक्त
इचलकरंजी महानगरपालिका

अटी / शर्ती -

१. प्रत्येक प्रशिक्षणचे दरपत्रक स्वतंत्र देणेत यावे.
२. प्रशिक्षणाचा पुर्ण कालावधी हा 40 दिवस 45 मिनीट प्रती दिन असा राहील.
३. प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम सोबत देणे बंधनकार राहील.
४. प्रशिक्षणामध्ये लाभार्थी संख्या ही 30 इतकी राहील.
५. **थ्री-व्हीलर ड्रायव्हींगचे कच्चे व पक्के दोन्ही लायसन कोटेशनधारक यांनी देणे बंधनकारक राहील. यानुसार कोटेशन सादर करणेचे आहे.**
६. नविन जी.एस.टी.कर प्रणालीनुसार निविदा भरणेची आहे.
७. प्राप्त दरपत्रक मधील सर्वात कमी दराच्या आधारे संबंधीत प्रशिक्षण कामाचे अंदाजपत्रक तयार होवून त्यांना कामाचा कार्यादेश देणेत येईल.
८. प्रशिक्षणसाठी आवश्यक वाहन, ठिकाण निविदाधारकांनी पुरवठा करणे बंधनकारक राहील. महानगरपालिकेकडून पुरवठा करणेत येणार नाही यांची नोंद नाही.
९. उक्त प्रशिक्षणाबाबत तांत्रिक बाबींचे मार्गदर्शन (Lecture) देणे आवश्यक आहे.
१०. संबंधित प्रशिक्षण पूर्ण झालेनंतर लाभार्थी यांना प्रशिक्षण पुर्णत्वेबाबतचे प्रमाणपत्र संबंधीत निविदाधारक स्व:खर्चाने यांनी देणे बंधनकारक राहील.